आजचे कार्यक्रम

■ स्थानिक कार्यक्रम अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नाशिक शाखेच्या वतीने स्नेहल जोशी लिखित आणि स्वप्नमंजुषा दिग्दर्शित बळीचं तळं या कथेचे अभिवाचन
वेळ : संध्याकाळी ६ वाजता
स्थळ : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद समागृह, कालिदास कलामंदिर, नाशिक

थोडक्यात

देवस्थान जागेसाठी सानप यांचे उपोषण

नाशिक । सिन्नर तालुक्यातील गुळवंच येथील श्रीरामचंद्र देवस्थान ट्रस्ट येथील देवस्थान इनाम गट क्र. १२७९ चा कायदेशीर ताबा मिळावा यासाठी कारभारी सुकदेव सानप यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर केला आहे. मात्र त्यांना गेल्या १० वर्षांपासून न्याय मिळत नसल्याने त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. सानप यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. त्यात सुका मुरलीधर सानप यांची या जागेवर वारस नोंद झाली असून त्यानुसार कारभारी सुकदेव सानप व इतर ३ यांची नावे दाखल झाली आहेत. कारभारी सानप यांच्या अर्जानंतर तहसीलदारांनी अर्जाची चौकशी करून देवस्थान इनामी जमिनीबाबत नियमानुसार कार्यवाही करावी, असे आदेश दिले होते. मात्र आजपर्यंत कार्यवाही झालेली नाही.

इच्छामणी नगरात घरफोडी

नाशिक । आडगाव शिवारातील बंद रो हाऊसचा कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी पावणेदोन लाखांचा ऐवज चोरून घरफोडी केली. गणेश रुंजाजी भालेकर (३२, रा. सरगम रेहाऊस, इच्छामणीनगर, आडगाव शिवार) यांच्या फिर्यादीनुसार, रविवारी (दि. १७) मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी १ लाख ७३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. आडगाव पोलिसात गुन्हा दाखल आहे.

आश्रमशाळा विद्यार्थ्यांना नवा मंच

आदिवासी विकास विभाग-स्लॅम आऊट लाऊड संस्थेत सामंजस्य करार

नाशिक । प्रतिनिधी

आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांच्या संकल्पनेतून राज्यातील शासकीय आश्रमशाळा आणि एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलमध्ये सामाजिक व भावनिक शिक्षणावर आधारित 'अभिव्यक्ती' प्रकल्प राबवण्यासाठी फाऊंडेशन ऑफ आर्टस् फॉर सोशल चेंज इन इंडिया (स्लॅम आऊट लाऊड) या संस्थेसोबत तीन वर्षांचा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

हा प्रकल्प शासकीय आश्रमशाळा आणि एकलव्य स्कूलमधील प्रवेशित अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी कला शिक्षणाचा नवा अध्याय असणार आहे. त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भावना व कला सादरीकरणासाठी हक्काचा मंच मिळणार आहे.

'अभिव्यक्ती' प्रकल्पाच्या माध्यामातून विद्यार्थ्यांच्या सामजिक व भावनिक शिक्षणावर लक्ष केंद्रित केले जात आहे. हा प्रकल्प शासकीय आश्रमशाळा आणि एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलमधील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी कला सादरीकरणाचे व्यासपीठ बनले आहे. या व्यासपीठावरून विद्यार्थ्यांना व्यक्त होण्याची संधी मिळणार आहे.

■ **लीना बनसोड,** आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय

सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षात 'अभिव्यक्ती' या पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी अमरावती, नागपूर, ठाणे आणि नाशिक अपर आयुक्त कार्यालयातील २०० आश्रमशाळांमध्ये करण्यात आली होती. २०० शिक्षक आणि सुमारे १०,००० विद्यार्थ्यांपर्यंत हा प्रकल्प पोहोचवण्यात आला होता. या प्रकल्पाचे फलित म्हणजे आदिवासी विद्यार्थ्यांनी पुणे येथील 'कबीर' तर मुंबई येथील 'स्पोकन' व 'लव्ह बटन' यासारख्या नावाजलेल्या कला महोत्सवात सहभाग नोंदवत कलाविष्कार सादर करत चुणूक दाखवली होती.

पथदर्शी प्रकल्पाच्या यशस्वीतेनंतर 'अभिव्यक्ती' प्रकल्पाचा विस्तार ४९७ शासकीय आश्रमशाळा आणि ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलमध्ये होणार आहे. या प्रकल्पात सुमारे ५८ हजार विद्यार्थ्यांना सामावून घेण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील ५३४ शिक्षकांच्या तीन दिवसीय प्रशिक्षणाला ८ सप्टेंबर २०२५ पासून सुरुवात होणार आहे. दरम्यान, सामंजस्य कराराप्रसंगी आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड, उपायुक्त संतोष ठुबे, स्लॅम आऊट लाऊडच्या नेहा राठी, अश्विनी सावंत, कल्याणी दडमल, राहुल राय, युएनडीपीच्या अमृता भालेराव आदी उपस्थित होते.

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सामाजिक-भावनिक शिक्षण महत्त्वाचे आहे. 'अभिव्यक्ती'द्वारे विद्यार्थी स्वतःला आणि त्यांच्या समाजाला समजून घेत आहे. त्यांच्या भावना आदिवासी संस्कृतीत रुजलेल्या कला प्रकारांद्वारे सादर करत आहे. हे समूद्ध आदिवासी सांस्कृतिक वारशाचे प्रतीक म्हणावे लागेल.

■ **नेहा राठी,** संचालक, स्लॅम आऊट लाऊड

मेडिकल नीट पीजी परीक्षेत तेजस बनकर देशात ३५४ वा

नाशिक। नुकत्याच झालेल्या मेडिकल नीट पीजी-२०२५ परीक्षेत चांदशी (ता. नाशिक) येथील डॉ. तेजस बनकर ८०० पैकी ६४७ गुण मिळवून संपूर्ण देशात ३५४ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

टपारिया टूल्सचे कर्मचारी महंत माणिक बनकर यांचा तो मुलगा आहे. मन लावून केलेला अभ्यास आणि आई-वडिलांचे पाठबळ यामुळे मी हे यश मिळवू शकलो, असे तेजसने आपल्या मनोगत सांगितले. त्याचे सर्व थरातून अभिनंदन होत आहे.

जनता विद्यालयात समाजदिन

मातोरी । येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जनता विद्यालय व अभिनव बाल विकास मंदिर यांचे संयुक्त विद्यमाने आद्य कर्मवीर यशवंतराव थोरात यांची जयंती समाजदिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

'लाडकी बहीण' शासकीय महिला कर्मचाऱ्यांवर कारवाईचे संकट

नाशिक । प्रतिनिधी

लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांची चौकशी सुरू झाल्यानंतर राज्यभरात १,१८३ शासकीय महिला कर्मचारी या योजनेचा लाभ घेत असल्याचे समोर आले आहे. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचा समावेश असण्याची शक्यता असून अशा कर्मचाऱ्यांचा शोध घेण्याची मोहीम सुरू आहे.

राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपये देणाऱ्या योजनेत नाशिक जिल्ह्यातील शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी लाभ घेतल्याचे उघडकीस आले आहे.

जिल्हात या योजनेसाठी १५ लाख ४० हजार महिलांचे अर्ज पात्र ठरले होते. मात्र त्यापैकी सुमारे ९५० महिलांनी योजनेतून माघार घेतली आहे. माहिती तंत्रज्ञान राज्य शासनाचे पत्र प्राप्त झाले असून त्यानुसार महिला कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात येणार आहे. कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर संख्या निश्चित होईल.

■ **सुनील दुसाने,** जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी

विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषदेत कार्यरत असलेल्या १,१८३ महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. महिला व बालकल्याण विभागाकडे या कर्मचाऱ्यांची नावे प्राप्त झाली असून, त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे.

राज्य शासनाचे पत्र प्राप्त झाले असून, त्यानुसार महिला कर्मचाऱ्यांची चौकशी केली जाणार आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर या कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित होईल आणि पुढील कारवाई केली जाईल.

मोबाईल हिसकावला

नाशिक । सिडकोतील हेडगेवार चौकातून पायी जाणाऱ्या युवकाच्या हातातील मोबाईल दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी हिसकावून नेला. अब्दुल करीम अब्दुल रहिम (२८, रा. हेडगेवारनगर) यांच्या फिर्यादीनुसार, सोमवारी (दि. १८) रात्री साडेनऊच्या सुमारास ते हेडगेवार चौकाकडून दत्त मंदिर स्टॉपकडे पायी जात होते. त्यावेळी पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या दोघांपैकी एकाने त्यांच्या हातातील १५ हजारांचा मोबाईल हिसकावून नेला.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन

नाशिक। प्रतिनिधी

संभाजी ब्रिगेडच्या वतीने महाराष्ट्र भर सुरू असलेल्या आंदोलनाचा भाग म्हणून नाशिक जिल्ह्यातही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करण्यात आले.

या निवेदनात शेतकरी कर्जमाफी, ऊस, कांदा, कापूस व दूध दरवाढ, मराठा व धनगर आरक्षण, निवडणुका बॅलेट पेपरवर घेणे तसेच अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याच्या मागण्या करण्यात आल्या. संभाजी ब्रिगेडने निवडणुकीतील शेतकरी कर्जमाफीच्या आश्वासनाची आठवण करून दिली. तसेच दूध भेसळीवर कठोर कारवाई करून दुधाला किमान ७० रुपये दर जाहीर करावा, वजनकाटे पारदर्शक ठेवण्यासाठी कायदा करावा, अशी मागणीही निवेदनात नोंदवली. जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल वाघ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या आंदोलनात नाना बच्छाव, नितीन रोटे, हिरामण वाघ, विक्रम गायधनी, महिला अध्यक्ष प्रज्ञा टुपके, नितीन काळे, राम खुर्दळ, प्रेम भालेराव, लकी बावस्कर, राकेश जगताप, मंदार धिवरे, नीलेश गायकवाड, महेंद्र बहेरे, अमोल जाधव, शंकर वाघमारे, गणेश सहाणे, वैभव पवार, संजय पांगारे, सागर चौधरी, संतोष बोके, भीमराव शिंदे, माधव नाठे, सुनीता साळवे, मीनाक्षी राठोड, दीपा गुरखा, ज्योती राऊत, गौरी शिंदे आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

एक कोटीची लाच मागितल्याचा दावा

बांधकाम कंत्राटदाराने दिला एसीबीकडे अर्ज

उपसभापतींनी आरोप फेटाळले

नाशिक। प्रतिनिधी

पेठरोडवरील शरदचंद्र पवार मार्केट यार्डाच्या व्यापारी संकुलातील बांधकामाचे बिल मंजूर करत प्रस्तावित बांधकामासाठी मार्केट कमिटीचे उपसभापती संशयित विनायक माळेकर यांनी सुमारे एक कोटी रुपयांची लाच मागणी केल्याचा दावा कंत्राटदार गणेश पगार यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार अर्ज दाखल केला असून योग्य ती कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समिती नेहमीच चर्चेत असते. आता ती पुन्हा एकदा लाचखोरीच्या चर्चेने गाजू लागली आहे. नोंदणीकृत ठेकेदाराने गंभीर आरोप केल्याने आता एसीबीकडून प्रकरणाची पडताळणी होण्याची शक्यता आहे. गणेश बाळकृष्ण पगार हे नोंदणीकृत बांधकाम ठेकेदार आहेत. सप्टेंबर २०२४ मध्ये त्यांना शरदचंद्र पवार मार्केट यार्डातील व्यापारी संकुल क्रमांक चारचे उर्वरित बांधकाम करण्याचे काम मिळाले होते. कार्यारंभ आदेश प्राप्त असताना जवळपास ४० टक्के कामकाज पूर्ण झाले होते. त्याचे बिलदेखील मिळाले. दरम्यान, मार्च २०२५ मध्ये बाजार समितीत सत्ता परिवर्तन झाले. एप्रिल महिन्यात बिल सादर केले असता बाजार समिती उपसभापती विनायक माळेकर यांनी सुरू असलेले बांधकाम थांबवण्यास सांगितले. 'हे काम तू कोणाला विचारून करतो? यानंतर तुला बिल कसे मिळते हे बघतोच' व बिल हवे असेल तर पुढील कामाचे एक कोटी रुपये द्यावे लागतील, त्यात पन्नास लाख रुपये अँडव्हान्स व बिल मंजूर झाल्यानंतर ५० लाख रुपये द्यावे लागतील, अशी मागणी केल्याचा दावा पगार यांनी तक्रार अर्जात केला आहे. या प्रकारामुळे मानसिक तणावासह आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे, तरी कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली असून विनायक माळेकर यांनी आपल्यावरील आरोपांचे खंडन केले आहे. माझ्याविरोधात करण्यात आलेले आरोप तथ्यहिन असून याबाबत पोलिसांकडे तक्रार केल्याचे माळेकर यांनी सांगितले.

पान १ वरून

भारताने रशियातून अमेरिकेला सुनावले

भारताने रशियासोबत सर्वात मोठी व्यापारवाढही केलेली नाही, दक्षिणेत काही देशांचा अधिक व्यापार आहे. मात्र, अमेरिकेने रशियाकडून तेल आयात करण्यासाठी चीनवर अद्याप कोणतीही बंदी का घातलेली नाही, हे आम्हाला समजत नाही. जयशंकर म्हणाले, अमेरिका गेल्या अनेक वर्षांपासून म्हणत आहे की, भारताने रशियाकडून तेल खरेदी करून जागतिक ऊर्जा बाजारपेठ स्थिर करण्यास मदत करावी. मात्र, आता अमेरिका रशियन तेल खरेदी केल्यामुळे भारतावर अतिरिक्त शुल्क लादतो. भारत फक्त रशियाकडून नाही तर अमेरिकेकडूनही तेल खरेदी करतो आणि त्याचे प्रमाण काही काळापासून वाढले आहे. त्यामुळेच अमेरिकेचा युक्तिवाद आमच्या समजण्यापलीकडे आहे.

मुख्यमंत्री भेटीचे 'राज' नागरी प्रश्नांचे कारण

बसला. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात वेगवेगळे तर्क-वितर्क लावले जात आहेत. मात्र या भेटीनंतर राज ठाकरे यांनी लगेच पत्रकार परिषद घेत फडणवीस यांच्या भेटीत झालेल्या चर्चेची माहिती दिली.

राज ठाकरे म्हणाले, गेल्या काही महिन्यांपासून दोन ते तीन विषयांवर मी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करतो आहे. शहर नियोजनाबाबतचे सादरीकरण घेऊन मी आज त्यांना भेटलो. त्यांना याबाबतचा एक छोटा आराखडा दिला. या बैठकीला पोलीस आयुक्तदेखील उपस्थित होते. या आराखड्यावर ते काम करतील. अनधिकृत पार्किंगबाबत काय करता येईल, सरकारने कोणती पावले उचलण्याची गरज आहे, याबाबत आम्ही एक सादरीकरण दिले.

मुंबईत आणि इतर शहरांमध्ये पुनर्विकासामुळे लोकसंख्या वाढली आहे, पण रस्ते आणि मूलभूत सुविधा तेवढ्याच राहिल्या आहेत. परवा मोनो रेल्वे तिरकी झाली, थोडक्यात अपघात टळला. रस्ते वाढत नाहीत, पण इमारती मोठ्या होत आहेत. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात पुनर्विकास सुरू असून, जिथे पाच माणसे राहायची तिथे आता ५०० राहायला आल्याने मूलभूत सोयीसुविधांचा बोजवारा उडाला आहे. रस्ते नीट नाहीत, २४ तास वाहतूककोंडी ही आता नित्याची बाब झाली आहे. आपण मात्र कबूतर आणि हत्ती यांच्यात अडकलो आहोत. मूलभूत समस्यांकडे आपले लक्षच नाही, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

भाजपची मते जुळवाजुळव

आणण्यासाठी भाजपकडे पुंसे संख्याबळ असले तरी ही निवडणूक गुप्त मतदानाने होत असल्याने आपली मते कायम राखण्याबरोबरच विरोधी पक्षातील काही खासदारांची मते मिळवण्याचे भाजपचे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्रात महाविकास आघाडीतील शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची तसेच शिवसेना ठाकरे पक्षाच्या खासदारांची मते मिळवण्याचा भाजपचा प्रयत्न असून ही जबाबदारी देवेंद्र फडणवीस यांच्यावर सोपवण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी विनंती केली असली तरी दोन्ही पक्षांकडून पाठिंबा मिळण्याची शक्यता कमीच आहे. इंडिया आघाडीचे उमेदवार बी.सुदर्शन रेड्डी यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला तेव्हा स्वतः शरद पवार उपस्थित होते. शिवाय पवार यांनी सुदर्शन रेड्डी यांना पाठिंबा देणारे ट्विटसुद्धा केले आहे. त्यामुळे आता खासदारांशी थेट संपर्क करून मते फोडण्याचे प्रयत्न होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

'गावकी'तून हरवला सर्जा-राजाचा रुबाब

महाराष्ट्रात काही भागात दोन दिवस हा सण साजरा होतो. पहिला दिवस मोठा पोळा आणि दुसरा दिवस तान्हा पोळा, जिथे लहान मुले लाकडाचे नंदीबैल सजवतात. मात्र, यांत्रिकीकरणामुळे या सणाचे पारंपरिक स्वरूप लुप्त होत आहे.पोळा सणाचा उत्साह कायम असला तरी सर्जा-राजासारख्या बैलजोड्या गावकीतून हद्दपार होत आहेत. शेती क्षेत्रात यांत्रिकीकरणाला पर्याय नाही, पण बैलांचे सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व जपण्यासाठी शासन आणि शेतकऱ्यांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे, अन्यथा 'सर्जा-राजाचा बाज' फक्त आठवणींमध्येच उरेल.

उपाय काय?

■ शुद्ध बैलांची पैदास वाढवण्यासाठी चांगले वळू निर्माण करणे.
■ शेतकऱ्यांपर्यंत गोशाळा पोहोचवणे आणि त्यांचे संवर्धन करणे.
■ बैलांसाठी मोफत उपचार आणि बैल खरेदी अनुदान योजना राबवणे.
■ शेतकऱ्यांना बैलांचा शेतीतील वापर वाढवण्यासाठी प्रोत्साहन देणे.

बैलजोडी खरेदी करणे आणि तिचा सांभाळ करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. अशा परिस्थितीत यांत्रिक शेती केली तर ती अधिक परवडते. चांगली बैलजोडी घ्यायची म्हटले तर एक लाखापर्यंत खर्च लागतो. त्या तुलनेत यांत्रिक शेतीला कमी पैसा लागतो. त्यामुळे शेतकरी आता एवढी मोठी रक्कम गुंतवायला तयार नाही.

■ **रमेश बदामे,** शेतकरी

शेती उद्योगात यांत्रिकीकरणाकडे शेतकरी झुकल्यामुळे बैलांची संख्या कमी होत आहे. बैलांपेक्षा यांत्रिकीकरणाची शेती परवडेल अशी सध्याची परिस्थिती आहे. जेव्हा यांत्रिकीकरण वाढते तेव्हा पशुधनाची संख्या आपोआपच कमी होते.

■ **डॉ.संजय शिंदे,** पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक

क्लासिफाईड /सुपरमार्केट

पाहिजेत

कृष्णा मेस, त्रिमूर्ती चौक, सिडको येथे मेस कामासाठी लेडीज व जेन्टस् पाहिजे - 8459677608. (CM-539)

खरेदी/विक्री

10 x 20 - २ कंटेनर, 20 x 10 / २-१ कंटेनर विकणे आहे. संपर्क मो. 9822502071. (CM-540)

जुना पेट्रोल पंप व कॉलेज जवळ निमगाव, ता. मालेगाव येथे गट नंबर १०१०, ११, १२ & १४ मध्ये २ विहिरी सह ३.५० एकर निर्विवाद जमीन विकणे आहे. 8999003537. (25/08-BK-4226)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... ✻ व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : ✻ व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपचार... ॲडमिट सुविधा... ✻ (विशेष) गरिबांसाठी फ्रीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00555)

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www.drpalve nashamukti kendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL CRG00554)

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00556)

जाहिराती

वाहन विषयक

जाहिरात छोटी ! किमया मोठी !!

नावात बदल

My old name Mrs.Kirti Yogesh Anshingkar has been changed to my new name Mrs. Priyanka Yogesh Ansingkar as per Aadhaar No. 9151 9546 4668. (CM-541)

My old name Mr.Yogesh Shrikrushna Anshingkar has been charged to my new name Mr.Yogesh Shrikrishna Ansingkar as per Aadhar card No. 8492 0656 2027. (CM-541)

MY OLD NAME AIJAZASGARALI JAKATI Has been Changed to NEW NAME AIJAZ ALI ASGARALI JAKATI As Aadhar No. 4891 3988 2186. (CM-542)

MY OLD NAME MOTLANI IRFAN has been changed to NEW NAME IRFAN ABDUL AZIZ MOTLANI As Aadhar No. 9974 4596 1034. (CM-542)

My OLD Name was MAZHAR MUSHTAQUE KAGD Now my NEW NAME is MAZHAR MUSHTAQ KAGDI as per my PASSPORT. (CM-542)

I Have changed my name from SUMAN PARLAHAD JHANKER To SUMAN PRALHAD ZANKER As Aadhar No. 3508 6341 4007. (CM-542)

My old name was Deepak Harish Dongre has been changed to new name Deepak Harishchandra Dongre as per Aadhar card No.4960 7352 0851. (BK-4229)

पावसामुळे भाजीपाला आवकेत घट

नाशिक । जिल्ह्यात बुधवारी झालेल्या पावसामुळे नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पालेभाजी, फळभाजी आवारात आवक घटलेली आहे. त्यामुळे दरातही वाढ झालेली आहे. टोमॅटो १००० ते १३०० रुपये जाळी, कोथिंबीर ४० ते ५० रुपये जुडीप्रमाणे विक्री होताना दिसत होती. त्याचबरोबर कोबी, फ्लॉवर, काकडी, वांगी, भेंडी, भोपळा, गिरके, दोडके आदी फळभाज्यांची आवक अत्यल्प होती. त्यामुळे त्यांच्या दरातही वाढ झालेली होती.

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
पिंपळगाव	२२५००	८००	१९७१	१५००
विंचूर	१३५००	६००	१७२६	१५००
निफाड	७०५०	६००	१६००	१५००
सायखेडा	३५७०	९०१	१५५०	१४७५

निधन वार्ता

विलास साळवे

देवळाली कॅम्प । जेलरोड चंद्रप्रभोनगर येथील विलास भिकाजी साळवे (४७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, भावजयी, पुतणे, पुतण्या, सहा बहिणी असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते विशाल साळवे यांचे काका तर इंडिया सिक्युरिटी प्रेसचे सेवानिवृत्त कामगार नेते प्रभाकर तेलोरे यांचे ते मेहुणे होत.



बेबीबाई जोंधळे

कसबे सुकेणे । येथील बेबीबाई रघुनाथ जोंधळे (६८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ जोंधळे यांच्या मातोश्री तर दत्तात्रय जोंधळे यांच्या त्या चुलती होत.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.
या सदरात केवळ १ ते ५ वर्षदरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.
◆ जाहिरात विभाग, दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆नाशिकरोड : प्रतिक ऑर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६◆ निफाड : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टँण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆दिंडोरी : दिंडोरी कू.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८◆ मालेगांव : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्यजवळ. ०२५५४-२४३४६२२◆सिन्नर : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.

वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.